केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान
(NMBP-National Mission on Bovine Productivity) या योजनेच्या अंमजबजावणीस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: सीएसएस-२०१६/प्र.क्र.१८३/पदुम-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक : २३ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा</u>-

केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे पत्र क्र. एफ ३-१/ २०१६- एएचटी (एनपीबीबी), नवी दिल्ली, दिनांक ०३.०११.२०१६.

<u>प्रस्तावना:</u>

केंद्र शासनाने त्यांच्या वाचा-१ येथील पत्रान्वये, राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान (NMBP-National Mission on Bovine Productivity) ही योजना सन २०१६-१७ पासुन पुढील तीन वर्षे कालावधीकरिता राबविण्यासाठी व सदर योजनेंतर्गत प्रलंबित राहिलेल्या काही बाबी पुढील कालावधीमध्ये पुर्ण करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेली आहे.

राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान ही योजना धवल क्रांती- राष्ट्रीय पशुधन विकास योजनेंतर्गत राष्ट्रीय गोकुळ मिशनचाच एक भाग असून, या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे विविध ०४ बाबींचा समावेश आहे. सदरहु योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय:

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान (NMBP-National Mission on Bovine Productivity) या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यास याव्दारे, शासनाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत खालील विविध बाबींचा समावेश आहे.

१. **पशुसंजीवनी** : या योजनेअंतर्गत राज्यातील गायी / म्हशींना टॅगींग (Unique Identification) सह सर्व जनावरांना आरोग्य पत्रिका (नकुल स्वास्थ पत्र) पुरविणे आणि सर्व जनावरांची माहिती नॅशनल डाटाबेसवर अपलोड करणे.
२. **आधुनिक प्रजनन तंत्रज्ञान** : या योजनेचा उद्देश उच्च वंशावळीच्या व रोगमुक्त गायी / म्हशींची उपलब्धता वाढविणे हा असुन यामध्ये, इनव्हिट्रो फर्टिलायझेशन (IVF-In-Vitro Fertilization) / मल्टीपल ओहुलेशन आणि भृण प्रत्यारोपण (MOET-Multiple Ovulation and Embryo Transfer) आणि लिंगनिदान केलेल्या विर्यमात्रा वापर तंत्र या बाबींचा समावेश आहे.

३. **ई-पशुधन हाट -नकुल प्रजनन बाजार :** या योजनेचा उद्देश देशातील पशु प्रजननाचे कार्य करणाऱ्या संस्था व पशुपालन करणारे शेतकरी यांच्या मध्ये ई-मार्केट व्दारे दुवा साधणे असा आहे.

४. **राष्ट्रीय पशु जनुकीय केंद्र** (NBGC-IB- National Bovine Genomic Centre for Indigenous Breeds)**:** या योजनेअंतर्गत देशातील शुध्द देशी गो / महिष वंशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय पशु जनुकीय केंद्र स्थापन करणे असा आहे.

राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान योजनेची उद्दीष्टे -

१. उच्च वंशावळीच्या व रोगमुक्त गायी / म्हशींची संख्या वाढविणे, रोग प्रसारास आळा घालणे व याव्दारे त्यांचे दुध उत्पादन व उत्पादकता वाढविणे.
२. दुधाळ गायी / म्हशींची व त्यांच्यापासुन निर्माण होणारे दुध व दुग्धजन्य पदार्थ यांची गुणवत्ता वाढविणे.
३. सॅनेटरी व फायटोसॅनेटरी (SPS- Sanitary and Phytosanitory) बाबींची पुर्तता करुन, जनावरांच्या व पशुजन्य पदार्थांच्या खरेदी विक्रीला प्रोत्साहन देणे.
४. बोव्हाईन जर्म प्लासमसाठी ई-मार्केट पोर्टलव्दारे पशु प्रजननाचे कार्य करणाऱ्या संस्था व आर्थिकदष्टया कमकुवत पशुपालन करणारे शेतकरी यांच्यामध्ये समन्वय साधणे.
५. मा. पंतप्रधान, भारत सरकार यांनी उद्दीष्ट ठरविल्याप्रमाणे सन २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट करणे.

राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान ही योजना सन २०१६-१७ पासुन पुढील ३ वर्षात राबविण्यासाठी व सदर योजनेतील प्रलंबित राहिलेल्या काही बाबी पुढील कालावधीमध्ये पुर्ण करण्यास्तव केंद्र शासनाने राज्यास रु. ५७२.२० लक्ष नियतव्यय मंजुर केलेला आहे.

राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियाना अंतर्गत बाबी -

अ. क्र.	तपशिल	अर्थसहाय्याचे प्रमाण	
		केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
१	**पशुसंजीवनी-**		
अ	जनावरांची ओळख पटविण्यासाठी टॅग खरेदी	६०	४०
ब	आरोग्य पत्रिका छापणे	६०	४०
क	टॅग ॲप्लीकेटर खरेदी	६०	४०
ड	टॅबलेट खरेदी व संगणकीकरण	६०	४०
२	**आधुनिक पशु प्रजनन तंत्रज्ञान-**		
अ	लिंगनिदान (Sex Sorted) केलेल्या रेतमात्रांच्या निर्मीतीसाठी प्रयोगशाळांमध्ये तंत्रज्ञान उभारणे (यंत्रसामुग्रीचा खर्च)	६०	४०
ब	लिंगनिदान केलेल्या रेतमात्रा निर्मीती साठी येणारा खर्च	६०	४०
क	संशोधन व विकास कार्यक्रम	१००	०
ड	भृण प्रत्यारोपन प्रयोगशाळा उभारणे	१००	०

३	**ई-पशुहाट-नकुल प्रजनन बाजार-**		
अ	संगणक प्रणाली विकसीत करणे	१००	०
ब	राज्यस्तरावरील मनुष्यबळ	१००	०
क	केंद्रीय स्तरावरील मनुष्यबळ	१००	०
४	**देशी जनावरांचे राष्ट्रीय जनुकीय केंद्र**		
१	देशी जनावरांच्या जातीकरीता जनुकीय चीप तयार करुन प्रमाणित करणे	१००	०
२	जनावरांच्या उत्पादनविषयक नोंदी घेणे	१००	०
३	नमुने गोळा करण्यासाठीचा खर्च	१००	०
४	स्क्रिनींग करावयाच्या जनावरांचे जिनोटायपींग	१००	०
५	मनुष्यबळ उपलब्धता	१००	०
६	मानव संसाधन विकास (क्षमता सुधारणा)	१००	०
७	देशांतर्गत प्रवास	१००	०
८	उपकरणे खरेदी	१००	०

योजना अंमलबजावणी यंत्रणा:-

केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे, राज्यात सदर योजनेंतर्गत घटकांची अंमलबजावणी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, राज्य पशुसंवर्धन विभाग आणि दुध संघांकडील कार्यरत कृत्रिम रेतन तंत्रज्ञ तसेच, एनपीबीबीडीडी अंतर्गत नेमण्यात आलेले सेवादाते- MAITRI व एनडीपी-१ अंतर्गत स्थापण झालेले MAITs या सर्वांच्या सहभागाने करण्यात यावी.

ईनाफ (INAPH) / एनएडीआरएस (NADRS- National Animal Disease Reporting System) या प्रणालीवर डाटा अपलोड करण्याकरिता अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

राज्यातील कृत्रिम रेतन करणाऱ्या सर्व शासकीय संस्था व एनपीबीबीडीडी (NPBBDD-National Programme for Bovine Breeding and Dairy Development) अंतर्गत नेमणुक करण्यात येणारे सेवादाते (MAITRI-Multipurpose Artificial Insemination Technicians in Rural India) यांना कृत्रिम रेतनाची व लसीकरणाची माहिती ईनाफ या नॅशनल डाटा बेस संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी टॅबलेट / नेटबुक चा पुरवठा करण्यात यावा. योजनेच्या प्रारंभिक काळात टॅबलेट / नोटबुकचा पुरवठा होईपर्यंत, कृत्रिम रेतन कार्य व लसीकरणाच्या नोंदी नोंदवह्यावर घेण्यात याव्यात व सदरच्या नोंदी तालुका व जिल्हा स्तरावरुन ईनाफ नॅशनल डाटाबेस या संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात.

सदर प्रकल्पाच्या पुढील अंमलबजावणीसाठी लागणारा आवर्ती खर्च, राज्य शासन अथवा अंमलबजावणी यंत्रणेमार्फत करण्यात यावा.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला या संस्थेस सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी अंमलबजावणीसाठी यंत्रणा (Implementing Agency) म्हणुन घोषित करण्यात येत आहे.

योजना अंमलबजावणीसाठी नविन लेखाशिर्ष-

सदरहु योजनेसाठी ६० टक्के केंद्र हिश्याचा निधी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ या अंमलबजावणी यंत्रणेस थेट वितरीत होणार असुन, उर्वरित ४० टक्के राज्य हिश्यासाठी नवीन लेखाशिर्ष स्वतंत्रपणे यथावकाश कळविण्यात येईल.

योजनेचे मुख्य लक्षांकित फलित :-

१. उच्च उत्पादकता व चांगले आरोग्य असलेल्या जनावरांची शोध प्रक्रीया सुलभ करणे.
२. जनावरांच्या विविध रोगाच्या प्रसारास आळा घालण्याकरिता जनावरांना टॅगिंग करुन रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविणे.
३. जनावरे निरोगी व अधिक उत्पादनक्षम होण्यासाठी त्यांचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन करणे.
४. जनावरांचे उत्पादन व उत्पादनक्षमता वाढविणे.
५. पशुधन व पशुजन्य पदार्थांची गुणवत्ता वाढविणे.
६. पशुधन व पशुजन्य पदार्थांच्या खरेदी / विक्री करीता एसपीएस आधारीत बाजार उपलब्ध करुन देणे.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन वेळोवेळी निर्गमित होणा-या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन केंद्र हिश्याचा व त्यास समरूप राज्य हिश्याचा निधी खर्च करण्यात यावा.

सदरहु कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावरुन सर्व संबंधीतांना तात्काळ निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.३४९/१४३१ व वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.२७३/१७/व्यय-२, दि.८.०९.२०१७ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा संकेतांक २०१७१०२३१६३९३०४३०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आलेला आहे.

.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.10.23 16:28:36 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२..
२. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२..

४. वित्त विभाग (व्यय-२ / अर्थसंकल्प-१५) मंत्रालय, मुंबई-३२.
५. नियोजन विभाग (कार्या-१४३१), मंत्रालय, मुंबई-३२
६. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७
७. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-१८.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला.
९. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व).
१०. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व).
११. विभागीय व्यवस्थापक, गोठित रेत प्रयोगशाळा, पुणे / औरंगाबाद (हर्सुल) / नागपुर.
१२. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१३. जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (सर्व).
१४. अवर सचिव (पदुम-३), कक्ष अधिकारी (पदुम-१/१६), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती (पदुम-४) .